**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाच्या डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राद्वारे पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान कार्यक्रमाचे १० एप्रिलला आयोजन

अमरावती :

शिक्षणमहर्षि डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुण्यतिथी निमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राच्यावतीने 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषिविषयक विचार आणि शेतकऱ्यांचे कृषिविषयक शिक्षण' या विषयावर व्याख्यानाचे दि. १० एप्रिल, २०२१ रोजी स. ११.०० वाजता आभासी पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर भूषविणार असून व्याख्याते म्हणून नागपूर येथील सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

सदर ऑनलाईन व्याख्यान कार्यक्रमामध्ये सहभाही होण्यासाठी https://youtu.be/uR4UOP5Bkk0 लिंक देण्यात आली आहे. तरी सदर व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा व जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राचे समन्वयक डॉ.एस.आर. जगताप व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०७/०३/२०२१.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी